# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-२०२३/प्र.क्र.९२/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १०.०४.२०२३

प्रति,

अपर मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वनजमिन-पुणे
पाण्याची पाईपलाईन टाकण्याकरीता ता.इंदापूर, जि.पुणे येथील ०.८३ हे राखीव वनजमीन वळती करणेबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/ नोडल /पुणे /ID-१३०७४ (२५) /२९४३/ २०२२-२३, दि. ०२.०२.२०२३.

संदर्भाधीन दिनांक ०२.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मे. बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रॉडक्ट लि, भिगवण, पुणे यांना पाण्याची पाईपलाईन टाकण्याकरीता ता. इंदापूर, जि.पुणे येथील ०.८३ हे राखीव वनजमीन वळतेकरणाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली नमूद मुद्यांची माहिती आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

(१) प्रस्तावामध्ये प्रस्तावित क्षेत्र ०.८३ (०.८२९९) हे. नमूद आहे. परंतु, प्रकल्प यंत्रणेने ऑनलाईन पार्ट-१ मध्ये वळतीकरणासाठी प्रस्तावित क्षेत्र ०.८२४६ हे. असे नमूद केले आहे. त्यामुळे सुधारित ऑनलाईन पार्ट-१ सादर करावा.

(२) सदर प्रकरणी वनभंग झाला असल्यामुळे, दंडनीय नक्त वर्तमान मुल्याची रक्कम व दंडनीय पर्यायी वनीकरणासाठीची रक्कम भरण्यासंदर्भात प्रमाणपत्र सादर करावे.

(३) प्रस्तावित क्षेत्र संरक्षित क्षेत्रापासून १०.०० कि.मी. पेक्षा अधिक अंतरावर असल्याचे उपवनसंरक्षक यांनी प्रमाणित केले आहे. परंतु, Kml file चे अवलोकन केले असता, प्रस्तावित क्षेत्र कुंभारगांव पक्षी अभयारण्यापासून सुमारे ५००.०० मीटर अंतरावर असल्याचे दिसून येते. तरी, सदर प्रकल्प संरक्षित क्षेत्र व त्याच्या ESZ चा भाग आहे किंवा कसे ?

याबाबत खात्री करावी. संरक्षित क्षेत्र व त्याच्या ESZ चा भाग असल्यास उपशमन योजना / वन्यजीव मंजुरी घेणे आवश्यक राहील किंवा कसे ? याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय घेऊन, त्याप्रमाणे माहिती सादर करावी.

(४) उपवनसंरक्षक यांनी पर्यायी वनीकरणासाठी मौजे. कुंभारगाव, ता. इंदापूर, जि. पुणे येथील गट नं. १२० मधील १.०० हे. अवनत वनजमीन प्रस्तावित केली आहे. परंतु, प्रकल्प यंत्रणेने मौजे. कुंभारगाव येथील गट नं. १२८ येथील जमीन पर्यायी वनीकरणासाठी असल्याचे हमीपत्र सादर केले आहे. सबब, नेमकी कोणती वनजमिन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केले आहे. याबाबत माहिती सादर करावी.

(५) KML File च्या अवलोकनावरुन, प्रस्तावित क्षेत्रापैकी काही वनजमिन वहिवाटीखाली असल्याचे दिसते. सबब, सदर वनजमिनीवर अतिक्रमण आहे किंवा कसे ? याबाबत माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन